पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय,
क्रमांक - नस/८/कावि/८८४/२०१४
दिनांक - ०८/०५/२०१४

प्रति,

मा.........................................,
सदस्य, स्थायी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची सभा दिनांक - १३/०५/२०१४ रोजी आयोजित केले बाबत....

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक १३/०५/२०१४ रोजी सकाळी ११.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत- १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
मा.स्थायी समिती
कार्यपत्रिका क्रमांक- ११४

दिनांक - १३.०५.२०१४ वेळ - सकाळी ११.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक १३/०५/२०१४ रोजी सकाळी ११.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

विषय क्रमांक-१) मनपाचे विविध विभागास आवश्यक छपाई साहित्य छपाई करणेकामी ई.नि.सु.क्र. ४९/२०१३-१४ अन्वये प्राप्त झालेल्या बाब क्र.०८, २१, २९, ३०, ४६, ४९, ५६, ५९, व १०० एकुण ०९ बाबी लघुत्तम दरानुसार मे.अमृत मुद्रणालय यांचे बाब क्र.०८, २१, २९, ४६, ५६, ५९ व १०० नुसार एकुण ०७ बाबीसाठी र.रु.६१,०८९/- व मे आशिष एंटरप्रायजेय यांचे बाब क्र.३० व ४९ नुसार एकुण ०२ बाबीसाठी र.रु.३९,१५०/- असे एकुण र.रु. १,००,२३९/- (अक्षरी र.रू.एक लाख दोनशे एकोणचाळीस) चे खर्चास व करारनामा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक-२) **डॉ.श्री.रत्ना दानप्पा, स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र तज्ञ** यांना आकुर्डी रुग्णालयात मानसेवी **स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र तज्ञ** या पदावर आदेशाचे दिनांकापासुन ६ महीने या कालावधीसाठी दरमहा एकत्रित र.रु.१०००/- (अक्षरी र.रू.एक हजार) या मानधनावर नेमणुक देणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक-३) मनपाच्या वाय.सी.एम. रुग्णालयातील मायक्रोबायलॉजी लॅब विभागाने त्यांचे विभागात असणा-या Bactec MGIT 960 या उपकरणाची M/s.BD India Pvt.Ltd., यांचेकडून AMC करीता प्राप्त झालेले कोटेशन र.रु.१,१४,६०६/- व Biosafety Cabinet Type II या उपकरणाची AMC करीता M/s.Kim Microsystems यांनी सादर केलेल्या कोटेशन र.रु.१६,०००/- अधिक काम करतेवेळी आवश्यक लागणारे स्पेअर पार्टस याप्रमाणे करुन घेणेकामी निविदा न मागविता थेट पध्दतीने त्यांनी सादर केलेल्या कोटेशन दरानुसार येणा-या र.रु.१,३०,६०६/- (अक्षरी र.रू.एक लाख तीस हजार सहाशे सहा) चे खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक-४) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मोरवाडी कडील सन २०१३-१४ चे सुधारित अंदाजपत्रकातील छपाई या लेखाशिर्षावरील तरतुद र.रु.७५,०००/- लेखन साहित्य लेखाशिर्षावर तसेच वाहन निर्वाह लेखाशिर्षामधुन र.रु.४००००/- व प्रवासभत्ता लेखाशिर्षामधुन र.रु.५०००/- अशी एकुण र.रु.४५०००/- प्रशिक्षणापोटी खर्च या लेखाशिर्षावर वर्ग करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक-५) औद्योगिक प्रशिक्षण संस्था (मुलींची) कासारवाडीकडील सन २०१३-१४ चे सुधारित अंदाजपत्रकामधील पुस्तके शिलकी सामान लेखाशिर्षामधील र.रू.६६,०००/- बोनस तथा सानुग्रह अनुदान लेखाशिर्षावर वर्ग करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक-६) मा.स्थायी समिती ठराव क्र.१४९८ दिनांक २१/८/२००७ व सदर ठरावास दिनांक ४/९/२००७ चे दुरुस्तीनुसार नमुद करणेत आलेले "टाटा २५६१" चासीज ऐवजी "टाटा २५१६" चासीज अशी दुरुस्ती करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक-७) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२१/२०१३-१४ मधील अ.क्र.१२ अन्वये, मुंबई पुणे रस्ता दापोडी ते पिंपरी चौक कर्बस्टोन, फुटपाथ, रस्ता इ. देखभाल व दुरुस्ती करणेकामी मे.श्री.गणेश कन्स्ट्रक्शन (लक्ष्मण फेरूमल चौधरी) (नि.र.रु. ३२,६७,४०६/- (अक्षरी र.रु.बत्तीस लाख सदुसष्ट हजार चारशे सहा) पेक्षा ३८.३८ % कमी) या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.२१,१४,०४४/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक-८) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने महात्मा बसवेश्वर जयंती दि.२ मे २०१४ रोजी असल्याने सदर जयंतीचे औचित्य साधून दि.३०/४/२०१४ ते १/५/२०१४ या कालावधीत व्याख्याने, विविध कार्यक्रमांचे आयोजन कै.अंकुशराव लांडगे नाट्यगृह, भोसरी व जिजाऊ सांस्कृतिक भवन, मोहननगर, चिंचवड याठिकाणी करण्यात आलेले आहे. याकामी थेट पध्दतीने अंदाजे र.रु.१,००,०००/- (अक्षरी र.रु. एक लाख) इतका खर्च अपेक्षित असल्याने या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक-९) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने माहे फेब्रुवारी २०१४ ते मार्च २०१४ या कालावधीत विविध विकास कामांचे भुमीपुजन, चिखली येथिल ईडब्लुएस गृह प्रकल्पास मा.सचिव, अनिता अग्निहोत्री, गृहनिर्माण संस्था, भारत सरकार यांच्या भेटीचे व्हिडीओ शुटिंग करण्यात आले होते. तसेच मनपाच्या आकुर्डी व अन्थोनी गार्डन नेहरूनगर पिंपरी येथील अतिक्रमण कारवाई, मा.स्थायी समिती सभापती यांची निवड तसेच मनपाच्या विविध ठिकाणच्या भंगार मालाचे व्हिडीओ शुटिंग मे.दर्शन डिजिटल व्हिडीओग्राफी, सांगवी, पुणे-२७. यांच्याकडून (मे.रामा व्हिजन, थेरगांव यांच्याकडील जुन्या दराने) करुन घेण्यात आलेले आहे. त्याकरीता र.रु.१६,८००/- (अक्षरी र.रु.सोळा हजार आठशे) इतका खर्च आला असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक-१०) मा.क्रिडा समिती सभा दिनांक ७/५/२०१४ रोजी ठराव क्र. ८५ नुसार, मनपाच्या २१ व्यायामशाळांकरीता सन्मा.नगरसदस्य यांनी व अग्निशमन विभागातील कर्मचा-यांचे व्यायामशाळांकरीता विविध प्रकारचे व्यायामशाळा साहित्य खरेदी करणेस व त्याकामी येणा-या र.रु.२०,१३,२९०/- ( अक्षरी र.रु.वीस लाख तेरा हजार दोनशे नव्वद फक्त) अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास प्रशासकीय मान्यता व सदर व्यायामशाळा साहित्य खरेदीची कार्यवाही मध्यवर्ती भांडार विभागाकडून ई निविदा नोटीस प्रसिध्द करुन कार्यवाही करणेस व सदरचे विषयास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक-११) मा.क्रिडा समिती सभा दिनांक ७/५/२०१४ रोजी ठराव क्र. ८६ नुसार, जिल्हास्तर शालेय क्रीडास्पर्धा २०१३-१४ मधील ४७ खेळ प्रकारच्या स्पर्धांपैकी ४० खेळ प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन म.न.पा. क्रीडा विभाग यांनी केल्याने उर्वरित ७ खेळ प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन म.न.पा. परिसरातील ६ खाजगी शाळांकडे सोपविल्याने त्याकामी त्यांना प्रस्तावात नमुद प्रमाणे त्यांच्या नावापुढे नमूद केलेप्रमाणे एकूण र.रु.८०,४४०/- मंजूर करणेस व त्यांचेकडून प्राप्त झालेल्या देय खर्चाच्या बीलातील रक्कम व मंजूर रक्कम यातील जी रक्कम कमी असेल ती रक्कम त्यांना अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक-१२) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२२/२०१३-१४ मधील अ.क्र.२ अन्वये, प्रभाग क्र.४७ काळेवाडी येथील पवना नदीस अय्यप्पा मंदिराजवळ नव्याने घाट बांधणेकामी मे.के.पी.कन्स्ट्रक्शन (नि.र.रु.२८,०१,०४९/- (अक्षरी र.रु.अठ्ठावीस लाख एक हजार एकोणपन्नास) पेक्षा ३४.९९ % कमी) या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.१९,१२,०१०/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक-१३) मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र.९/१३-१४ मधील अ.क्र.१८ अन्वये, बिजलीनगर उपविभागातील प्र.क्र.२०, २१ व २२ मधील रस्त्यावरील दिवाबत्ती व्यवस्थेचे केबल पोल व फिटींगची वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणेकामी मे.मनिकॉम इलेक्ट्रीकल (नि.र.रू.११,२४,८५७/- [अक्षरी र.रू.अकरा लाख चोविस हजार आठशे सत्तावन्न] पेक्षा ३३.३३२ **%** कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक-१४) मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र.९/१३-१४ मधील अ.क्र.४९ अन्वये, प्रभाग क्र.१८ किवळे विकासनगर मधील किवळ्यापासून औंध-रावेत रोडने बापदेवनगर सिध्दीविनायक कॉलनी दरम्यानचा नाल्याच्या बाजूने नव्याने तयार होणा-या १८ मी. डी.पी. रस्त्यावर दिवाबत्ती व्यवस्था करणेकामी मे.रूपलक्ष्मी इलेक्ट्रिकल्स (नि.र.रू. २१,३३,५४९/- [अक्षरी र.रू.एकवीस लाख तेहतीस हजार पाचशे एकोणपन्नास] पेक्षा १९.००० **%** कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक-१५) मनपाच्या प्रशासकीय इमारतीमधील नवीन महापालिका सभागृहासाठी वापरात असलेल्या दोन्ही लिफ्टचे सन २०१४-१५ साठी वार्षीक देखभाल दुरुस्तीचे काम उत्पादीत कंपनी मे.कोने इलेव्हेटर इंडीया प्रा.लि. यांचेकडुन निविदा न मागविता थेट पद्धतीने परंतु रितसर करारनामा करुन करुन घेणेस व त्यापोटी येणारा खर्च र.रु. १,४४,३६६/- (अक्षरी र.रू.एक लाख चव्वेचाळीस हजार तीनशे सहासष्ट) प्राप्त झालेल्या कोटेशननुसार मे.कोने इलेव्हेटर इंडीया प्रा.लि. यांस आगाऊ अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.



नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय,
क्रमांक - नस/८/कावि/८८४/२०१४
दिनांक - ०८/०५/२०१४

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.